पुढारी

# मिरा-भाईंदर पालिका पटकावणार स्वच्छ सर्वेक्षणात पहिला क्रमांक?

## राज्यात प्रथम क्रमांकाने मानांकित केले जाण्याची शक्यता

**भाईंदर : राजू काळे**

मिरा-भाईंदर महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी पालिकेचा कारभार हाती घेतल्यानंतर त्यांनी कोव्हिड महामारीत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीसह त्यांनी शहर स्वच्छतेसाठी केलेल्या कामगिरीची दखल केंद्र शासनाने घेतली आहे. त्यामुळेच त्यांना यंदाच्या इंडियन स्वच्छता लीग स्पर्धेत ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात अव्वल स्थान दिले आहे. याखेरीज पालिकेला यंदा पार पडलेल्या स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये चक्क देशात तिसरा तर राज्यात प्रथम क्रमांकाने मानांकित केले जाण्याची शक्यता बळावल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. यापूर्वीच आयुक्तांनी पालिका यंदाच्या स्वच्छ सर्वेक्षणात देशस्तरावर पहिल्या तीन क्रमांकात स्थान मिळविण्यासाठी म्हैसूर, नोएडा शहरांसोबत स्पर्धा करीत असल्याचे स्पष्ट केले होते.

केंद्र शासनाने देशपातळीवर पहिल्यांदाच आयोजित केलेल्या इंडियन स्वच्छता लीग स्पर्धेतील विजेत्यांची यादी मंगळवारी जारी केली. त्यात स्पर्धेतील ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात पालिकेने प्रथम क्रमांक पटकावल्याचे जाहीर करण्यात आले. आयुक्तांनी गेल्या दिड वर्षांच्या आपल्या कारभारातून स्वच्छतेसह प्लास्टिक बंदी मोहीम प्रभावीपणे राबविली. त्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करीत अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त मारुती गायकवाड, रवि पवार, संजय शिंदे, शहर अभियंता दीपक खांबित, अतिरिक्त शहर अभियंता सुरेश वाकोडे, मुख्य लेखापरिक्षका मंजिरी डिमेलो, मुख्य लेखाधिकारी अजित कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी राजकुमार घरत यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी केली. पालिकेच्या या उल्लेखनीय कारभाराची दखल केंद्र तसेच राज्य शासन दरबारी घेण्यात आली असली तरी पालिकेच्या या कारभाराची प्रसारमाध्यमांनी देखील दखल घेत आयुक्तांच्या प्रत्येक मोहिमेला ठळकपणे प्रसिद्धी दिली. त्याचा लेखाजोखा शासन दरबारी बातम्यांच्या माध्यमातून पोहोचविला. यामुळे आयुक्त दिलीप ढोले यांच्या कार्यकाळात पालिकेला विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यात कोविड काळात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल अभिनेत्री दीपाली भोसले-सय्यद यांच्या चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते कोविड योध्दा पुरस्कारासह रोख ५० हजार रुपये पारितोषिकाने ८ ऑक्टोबर २०२१ रोजी त्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते २५ मार्च रोजी एका वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांचा सन्मान करण्यात आला. राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान स्पर्धेत तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते २१ एप्रिल रोजी तृतीय क्रमांकाच्या पुरस्कारासह ५ लाख रुपये पारितोषिकाने गौरविण्यात आले. माझी वसुंधरा अभियान अंतर्गत राज्यस्तरावर भूमी या थिमॅटिक गटात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दलही पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### स्वच्छतेप्रती घौडदौड कायम



यंदाच्या इंडियन स्वच्छता लीग स्पर्धेतील सुरुवातीच्याच निकालात पालिकेला महाराष्ट्रातील ३ ते १० लाख लोकसंख्या गटात प्रथम क्रमांकाने नामांकित करण्यात आले. हा पुरस्कार प्रदान सोहळा नवी दिल्लीतील तालकटोरा स्टेडियममध्ये ३० सप्टेंबर रोजी आयोजित पार पडणार आहे. यानंतर आयुक्तांनी स्वच्छतेप्रती आपली घौडदौड कायम ठेवून यंदाच्या स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये देशातील १ ते १० लाख लोकसंख्या गटात देशस्तरावर तिसरा तर राज्यस्तरावर पहिला क्रमांक पटकाविण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. याचप्रमाणे पालिकेला देशपातळीवर बेस्ट सिटी इन सिटीझन फीड बॅक वर्गवारीत प्रथम क्रमांक प्राप्त होण्याची शक्यता देखील वर्तविली जात आहे. या पुरस्कारासह स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कार १ ऑक्टोबर रोजी नवी दिल्लीतच प्रदान केला जाणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.